**“ऑगस्ट २०१८” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक १ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी लागणारे रिसायकलिंग टोनर पुरवठा करण्यासाठी दिनांक १ ऑगस्ट २०१८ ते ३१ जुलै २०१९ या कालावधीकरिता मे.शुभम इन्फोटेक, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई यांची पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- दिनांक २ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणानुसार घोषित करण्यात आलेल्या “कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल, ता.पलुस, जि.सांगली” या जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेस विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था म्हणून घोषित करण्यात आला आहे. तर “प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, रामेती खोपोली, रायगड” या विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेस जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण म्हणून घोषित करण्यात आला आहे.
- दिनांक ६ ऑगस्ट २०१८ च्या शासन शुद्धीपत्रान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक-१ ते ३ नुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त असलेल्या सैनिक कल्याण विभाग, पुणे व सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद या कार्यालयाच्या संचालकांना विभाग प्रमुख म्हणून तर सैनिक कल्याण विभाग, पुणे या कार्यालयाच्या उपसंचालक (प्रशासन) यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे.
- दिनांक ७ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य सेवा परीक्षेव्दारे शिफारसपात्र उमेदवारांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणास रुजू होण्यासाठी द्यावयाच्या १ वर्ष मुदतवाढीचे निकष ठरविण्यात आले आहेत.
- दिनांक १३ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमातून नगरपालिका / नगर परिषद, मुख्याधिकारी गट-अ आणि गट-ब संवर्ग वगळण्यात आले आहेत.
- दिनांक १६ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष उघडयात आला आहे. तसेच सदर लेखाशीर्षासाठी सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) चे सहसचिव (आस्थापना) याना नियंत्रक अधिकारी आणि अवर सचिव (२६-रोख शाखा) यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात आले आहेत.
- दिनांक १६ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कुपरेज येथील कार्यालयात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी येणारा रु.१३,८७,३०३/- इतका खर्च सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २१ ऑगस्ट २०१८ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे One week in service training programme for the year 2018-19 for IAS Officers (IAS, IPS & IFos), Officers working under the Central Staffing Scheme and Central Secretariat Service (CSS) / Central Secretariat Stenographers Service (CSSS) officers या विषयाचे D.O.No.12017/01/2018-TNP(S), Dt.16.08.2018 चे पत्र संबंधितांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.
- दिनांक २० ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे.
- दिनांक ३० ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृह, विधान भवन उपाहारगृह, मुंबई व कोकण भवन उपाहारगृह, नवी मुंबई येथील उपाहारगृहांच्या कार्यन्वियतेसाठी दिनांक १ सप्टेंबर २०१८ ते ३० जून २०१९ या कालावधीसाठी लागणारा कच्चा माल / वस्तु / साहित्य इत्यादीच्या खरेदीसाठी १६ अनुसूचिनिहाय पुरवठादारांच्या निम्नतम दराच्या निविदा स्वीकृत करण्यास खरेदी समितीने मान्यता दिली आहे.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल**

- भारतीय प्रशासन सेवेतील १४ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- अवर सचिव-२, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-३ व लिपिक टंकलेखक-२ अशा ८ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- अवर सचिव-१, लिपिक टंकलेखक-१ अशा २ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.
- उपसचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१ संवर्गातील २ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदलीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- उपसचिव-१, अवर सचिव-२, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- एका उपसचिवाला अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

**(ग) पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- ७ उपसचिवांना सहसचिव पदी, २ अवर सचिवांना उपसचिव पदी, ७ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव पदी, ३ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना कक्ष अधिकारी पदी पदोन्नती देण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- अवर सचिव-१, सहायक कक्ष अधिकारी-४, लिपिक टंकलेखक-१ अशा ६ अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- एका उपसचिवाचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- उपसचिव-१, अवर सचिव-३, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ५ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक १८ ऑगस्ट २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखक यांचे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा सन २०१८-१९ साठी दिनांक ७ सप्टेंबर २०१८ पर्यंत अर्ज पाठविण्याच्या पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

- दिनांक २७ ऑगस्ट २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांचे एका आठवडयाच्या सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमास कार्मिक व प्रशिक्षण विभागाने नामनिर्देशन अंतिम केल्यानंतर प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्यासाठी जाताना प्रशासकीय व्यवस्था करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक ३० ऑगस्ट २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१८ च्या प्रशिक्षण वर्गाचे दिनांक ४ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत परिषद सभागृह, सहावा मजला, मंत्रालय, मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील व्यवस्थापकीय बाजूच्या गट-ब व गट-क संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ व १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

* * * * * *